स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- ८ जुलै, २०२३

जळगाव दि.८ (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी. (सर्व विषय) तसेच एम.ए.(भूगोल) या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणे आणि ए.आर.सी.केंद्रावर कागदपत्रे पडताळणी करण्यास १२ जुलै २०२३ पर्यंत मुदत वाढवून देण्यात आली आहे. तसेच माहे मार्च/एप्रिल/ मे मधील पदवी अभ्यासक्रमांच्या फेरतपासणी व पूनर्मुल्यांकनात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा वरील पदव्युत्तर अभ्याक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करता येईल.

विद्यापीठाकडून केंद्रीय पध्दतीने एम.एस्सी. (सर्व विषय) तसेच एम.ए.(भूगोल) या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत ८ जुलै रोजी पर्यंत होती. विद्यार्थ्यांची प्रवेशा संदर्भातील मागणी तसेच विद्यापीठाने पदवी अभ्यासक्रमांचे फेरतपासणी व पुनर्मूल्यांकनाचे निकाल जाहीर केल्यामुळे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेशाची संधी त्यांना मिळावी यासाठी १२ जुलै पर्यंत मुदतवाढ देण्याचा विद्यार्थी हिताचा हा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन त्यांचे गुणपत्रक डाऊनलोड करुन त्याची प्रत अर्जासोबत अपलोड करावयाची आहे. तसेच ए.आर.सी. केंद्रांकडून ही प्रत ग्राहय धरली जाणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या वाढवून दिलेल्या मुदतीचा लाभ घ्यावा असे आवाहन प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी केले आहे.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी